बुधवार, दि ११ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक १२ वा ● किंमत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# तर लाडक्या बहिणींना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडणार - माजी आ. गोरंटयाल



**जालना । प्रतिनिधी -** लाडकी बहिण योजनेचे निकष बदलण्याच्या हालचाली शासनस्तरावर होत आहेत. मात्र, सदर योजनेच्या निकषात बदल केल्यास लाडक्या बहिणींना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा स्पष्ट इशारा माजी आ.कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

राज्यात विधानसभेच्या निवडणुकीत पराभव अटळ असल्याच्या भीतीमुळे महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेचे निकष निश्चित करतांना सत्ताधारी पार गोंधळलेल्या अवस्थेत असल्याचे प्रामुख्याने दिसून आले. या गोंधळाच्या स्थितीमुळेच योजना सुरू केल्यानंतरही निकषात अनेकवेळा बदल करण्याची नामुष्की राज्यकर्त्यांवर ओढवली अशी टीका गोरंटयाल यांनी केली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजने अंतर्गत पात्र असलेल्या लाडक्या बहिणींना राज्यात सरकार आल्यास प्रतिमहा १५०० रूपया ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा राज्यातील महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी निवडणूक प्रचारा दरम्यान केली आणि आपल्या पदरात राज्यातील लाखो महीला भगिनिंचे मतदान पाडून घेतले. या लाडक्या बहिणींच्या बळावरच राज्यात महायुतीने पुन्हा एकदा सत्ता हस्तगत केली असतांना सत्तेवर येण्यापूर्वीच लाडकी बहीण योजनेच्या निकषात बदल करण्याच्या हालचाली शासनस्तरावर सुरू असल्याचे दिसून येत आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी ज्या निकषानुसार लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला त्याच निकषानुसार पात्र महीला भगिनींना योजनेचा लाभ देवून महायुतीच्या नेत्यांनी निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी अशी मागणी करून जर राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या निकषात बदल करण्याचा प्रयत्न केला तर याच लाडक्या बहिणींना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा माजी आ.कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

## वर्णी ...

मंत्रीमंडळ विस्तार
कुणाकुणाची वर्णी
वेग वेगळी ती नावे
अफवा होती कर्णी
घडे बडे चमत्कार
जसे नारळा पाणी
मिळतो तसा प्रसाद
जशी ज्याची करणी
सत्ता येणार जाणार
सत्य उघड रे जाणी
निंदानालस्ती नको
लाघवी हवी वाणी
करावे तसेचं भरावे
भिन्न न राजकारणी
टिकून रहायचे कसे
जाणी काही धोरणी
संस्कृती बंधन भले
हिरा शोभे कोंदणी
चांगला होता नेता
काळ करेल नोंदणी
होऊन फक्त कुंपण
करा शिवार राखणी
सत्तेने स्वताचं यावे
कारकीर्द हो देखणी
कर्मवीर व्हावे असे
निंदा ना करो कोणी
जनतेच्या शिरटोपी
बनायचे मुकूट मणी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

### बांगलादेशातील हिंदूच्या मानवाधिकार संरक्षणासाठी जालना जिल्ह्यातील हिंदू एकवटला

# जिल्ह्यात मोर्चा, बंद, पदयात्रा आंदोलने

**जालना । घनसावंगी । प्रतिनिधी -** बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांच्या मानवाधिकार, मालमत्ता आणि जीवांचे संरक्षणासाठी मंगळवार (दि १०) रोजी जिल्हाभरात मोर्चा, आंदोलने, पदयात्रा काढण्यात आली काही ठिकाणी बंद पाळण्यात आला. जिल्ह्यातील जालना, परतूर, अंबड, घनसावंगी याठिकाणी सकल हिंदु समाजाच्यावतीने बांगलादेशातील हिंदु अल्पसंख्याकांच्या मानवाधिकारांचे होणारे उल्लंघन व त्यांच्या मालमत्तेची नासधूस आणि जिवीताला धोका याच्या विरोधात मोर्चा, आंदोलन, पदयात्रा काढण्यात आली तर जिल्ह्यातील घनसावंगी येथे मोर्चाचे आयोजन करत बंद पाळण्यात आला.

सकाल हिंदू समाजाने आपले संताप आणि चिंता व्यक्त करत बांगलादेशात हिंदू मंदिरांवर होणारे हल्ले, तोडफोड, तसेच हिंदू महिलांवर आणि मुलांवर होणारे अत्याचार यांचा तीव्र निषेध केला. मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या प्रतिनिधींनी म्हटले की, आम्ही भारताचे प्रबुद्ध नागरिक आहोत आणि बांगलादेशात होणाऱ्या अत्याचारांविरोधात आवाज उठवण्यासाठी एकत्र आलो आहोत. या क्रूर घटनांच्या विरोधात जागतिक स्तरावर कार्यवाही व्हावी अशी आमची मागणी आहे. मानवाधिकारांचे उल्लंघन थांबवण्यासाठी आम्ही भारतातील सर्व हिंदू बांधव आपल्या सोबत आहोत.

अशाप्रकारे केलेल्या असहिष्णू आणि अमानवीय अत्याचारांमुळे बांगलादेशातील हिंदू समूदाय हा त्रस्त आणि व्यचित असून जगभरातील हिंदू समुदाय याची दखल घेत आहे. बांगलादेशात झालेल्या ह्या धार्मिक अत्याचारांमुळे बागलसदेशातील हिंदूचे धार्मिक स्वातल्य वयात आले आहे आणि हया घटनामुळे विभिन्न वर्गियाने सहजीवन धोक्यात आल्याचे आणि बांगलादेश शासनाने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट दिसते.

दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी इस्कॉन ISKCON (International Society for Krishna Consciousness) च्या संबंधीत चिन्मय कृष्ण महाराज यांना खोटया गुन्ह्यात अडकवून जबदरस्तीने आणि हिंसात्मक पध्दतीने केलेली अटक ही निंदनीय आणि कुठल्याही शासनास अशोभनीय आहे. सदरील अटकेनंतर बांगलादेशातील हिंदू समाजाने लोकशाही पध्दतीने केलेल्या आंदोलनारा हिंसात्मक पध्दतीने आणि अत्याचाराने बिरडण्यात आले याचचरोबर असेही लक्षात आले आहे की, चिन्मय कृष्ण महाराजांना चिलानोंग मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे, जिथे त्यांना योग्य तो औषधोपचार आणि शाकाहारी भीजन मिळण्यास जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करण्यात येत आहेत ह्या बाबी जागतिक स्तरावर मान्य अशा मानवाधिकारांचे उल्लंघन करणा-या आहेत चिन्मय कृष्ण महाराजांना ज्या कारागृहात ठेवण्यात आलेले आहे त्याच कारागृहात विविध कट्टर मुस्लिम दहशतवादी संघटना जसे की, हिज्य उत तहरिर, जमातुल मुजाहिदिन बांगलादेश, हरकत उल जिहाद, अन्सार अह इस्लाम आणि इतर अशाच कट्टरपंथीय आणि अन्य दहशतवादी संघटनांशी संबंधित अतिरेक्यांना ठेवल्याचे समजते. ही बाब अतिशय गंभीर असून चिन्मय कृष्ण महाराजांच्या जिवीतास धोका निर्माण करणारी आहे आणि अशाप्रकारचे कृत्य

शासनाने करणे निषेधार्ह आहे, मातून बांगलादेश शासनाच्या हेतूवर शंका निर्माण होते. हया आहषी नंतर विन्मय कृष्ण महाराजांच्या इतर दोन सहकार्यांनाही अटक केल्याचे आणि शेकडो हिंदू धर्माचार्यांना भारतात घेण्यापासून मज्जाव केल्याचे लक्षात येते. अशाप्रकारे शासन स्तरावरून आणि बांगलादेशात असलेल्या बहुसंख्य मुस्लिम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हिंदूचे धार्मिक उत्पीडन जगासमोर आलेले आहे.

**सकल हिंदू समाज यांनी निवेदनात केलेल्या मागण्या...**

हिंदूव्या धार्मिक स्थळ आणि मंदिरांचे संख्क्षण बांगलादेशात स्थित हिंदू समाजाच्या सर्व धार्मिक स्थळांचे आणि मंदिरांचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने कठोर शब्दांमध्ये बांगलादेश सरकारला आपल्या भावना कळवून तात्काळ योग्य ती पावले उमलण्यास आग्रह करावा.

हिंदू धर्माचार्यांची सूटका इस्कनिने चिन्मय कृष्ण महाराज आणि त्यांचे सहकारी तसेच, इतर हिंदू धर्माचार्यांनी केलेल्या बेकायदेशीर अटकेतून तात्काळ सूटका व्हावी अशाप्रकारच्या सूचना भारत सरकारने बांगलादेशातील अंतरिम शासनास कराव्या हिंदू महिलांवर होणा-या अत्याचारांना प्रतिबंध बांगलादेशात झालेल्या सत्तांतरावेळी आणि पान ३ वर






# संपादकीय

## अभिनयातील भीष्माचार्य

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. बरोबर १०२ वर्षांपूर्वी म्हणजे ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कॅंटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कॅंटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे, ९९२२५४६२९५**

# ग्रहांचे संतुलन आणि सकारात्मक विचार हाच यशस्वी जीवनाचा मूलमंत्र - सरितादीदी

### महेश व्याख्यानमालेत आत्मविश्लेषण, ग्रहांचे महत्त्व आणि जीवनातील अडथळ्यांवर सकारात्मकतेने मात करण्याचा संदेश

**जालना । प्रतिनिधी -** ग्रहांचा अभ्यास फक्त भविष्य जाणून घेण्यासाठी न करता, त्यांचा उपयोग जीवनातील आत्मचिंतन आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी करावा. ग्रह आपल्याला कठीण काळात शिकवण देतात, ज्यामुळे आपण अधिक सजग आणि सशक्त बनतो. ग्रहांच्या अनुकूलतेसाठी आपले विचार आणि कृती महत्त्वाच्या ठरतात. ग्रहांच्या प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी आत्मचिंतन, ध्यानधारणा आणि सात्विक जीवनशैली गरजेची आहे. आपल्या विचारांची दिशा योग्य ठेवली तर जीवनातील अडचणींवर आपण सहज विजय मिळवू शकतो, असा मौलिक संदेश आंतरराष्ट्रीय मोटिवेशनल स्पीकर ब्रह्माकुमारी सरितादीदी यांनी येथे बोलताना दिला.



महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने रविवार दि. ८ डिसेंबर रोजी येथील महेश भवनमध्ये आयोजित एकदिवसीय महेश व्याख्यानमालेत ग्रहांशी मैत्री म्हणजे जीवनात सुख-शांती या विषयावर त्या बोलत होत्या. विचार मंचावर ब्रह्माकुमारी उर्मिलादीदी, ब्रह्माकुमारी शितलदीदी, महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष गोपाल मुंदडा यांची उपस्थिती होती.

यावेळी सरितादीदी पुढे म्हणाल्या की, जीवनात येणाऱ्या अडचणी, संघर्ष, यश आणि शांती यांसाठी आपण स्वतः जबाबदार असतो. त्यामुळे दुसऱ्यांना दोष देऊ नये. आपले भाग्य श्रेष्ठ बनण्यासह अडचणी आणि संकटावर मात करण्यासाठी परमात्म्याने काही उपाय सांगितलेले आहेत. ग्रहांना दोष न देता विचार शुद्ध ठेवून आपले कर्म श्रेष्ठ बनवा. कारण आपले भाग्य आणि ग्रह हे कर्मावर अवलंबून असतात. आपले सकारात्मक अथवा नकारात्मक विचार, जीवनशैली आणि कृती यावर त्यांचा प्रभाव अवलंबून असतो. जर आपली जीवनशैली योग्य असेल, मानसिकता सकारात्मक असेल आणि आपण आत्मिक शांततेचा अभ्यास केला तर ग्रह आपल्याला अनुकूल राहतात. हा अनुकूल ग्रहांचा प्रभाव जीवनातील सुख-शांती आणि यशाचा पाया ठरतो. सरितादीदींनी आई-वडिलांच्या संस्कारांचे महत्त्व सांगितले. त्या म्हणाल्या, आई-वडिल हे जीवनाचे पहिले गुरु आहेत. त्यांचा आदर आणि मार्गदर्शनामुळे आपण जीवनातील अडचणींवर सहज मात करू शकतो. त्यांच्या शुभेच्छा आणि आशीर्वादांमुळे ग्रहांचे संतुलन सहज साधता येते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात आत्मचिंतन आणि ध्यानाला महत्त्व द्यावे. यामुळे केवळ आपले मानसिक आरोग्यच सुधारत नाही, तर आपल्या ग्रहांचा प्रतिकूल प्रभावही कमी होतो. आपण स्वतःच्या जीवनाचे शिल्पकार आहोत. ग्रहांवर दोष न लावता आपले विचार आणि कृती बदलून आपले भविष्य घडवता येते, असा संदेश सरितादीदींनी दिला. आपल्या कर्मानुसार संकटे येणारच, परंतु त्यांचा सामना आत्मविश्वासाने करावा. शांत चित्ताने घेतलेले निर्णय नेहमीच यशस्वी ठरतात. आपल्या विचारांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसते. नकारात्मक विचार हे अशांतता आणि अपयशाला कारणीभूत ठरतात. त्यामुळे रोज सकारात्मक विचारांची सवय लावा. शांततेसाठी ध्यानधारणा ही एक उत्तम साधन आहे. ती केवळ मानसिक शांतीच नाही तर जीवनातील मोठ्या समस्या सोडवण्यासाठीही उपयुक्त ठरते. यावेळी सरितादीदींनी व्याख्यानमालेच्या संयोजकांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमात सन्मान लक्ष्मी मातांचा या उपक्रमाअंतर्गत पुरुष मंडळी द्वारा पुष्पवृष्टी करून महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महिलांच्या योगदानाचा गौरव करत सरितादीदी म्हणाल्या, महिलांचा आदर आणि सन्मानामुळे कुटुंब आणि समाजाची प्रगती होते. आपण प्रत्येकजण आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत. आपल्या कृती आणि विचारांवरच आपले भविष्य ठरते. आपण स्वतःला बदलू शकतो, म्हणजेच जग बदलण्याची ताकदही आपल्यामध्ये आहे. आई-वडिलांचा सन्मान, सकारात्मकता आणि आत्मजागृती हीच खऱ्या अर्थाने यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे, असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी ग्रहांचे मनुष्य जीवनाशी नाते उलगडून सांगितले. सूर्य ग्रहाला आपल्या जीवनात पित्याचे, चंद्र ग्रहाला मातेचे, मंगळ ग्रहाला भावाचे स्थान आहे. बुध हा बुद्धीचा ग्रह आहे. गुरु ग्रहाला सुरक्षा कवच म्हटले गेले आहे. शनी ग्रह न्यायाचे प्रतीक आहे, असे सांगून या ग्रहांचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम त्यांनी विशद केले.

प्रारंभी महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय राठी, अध्यक्ष गोपाल मुंदडा, जगदीश तोतला यांनी ब्रह्माकुमारी सरिता दीदी, ब्रह्माकुमारी उर्मिलादीदी, ब्रह्माकुमारी शितलदीदी, प. पू. मनोज महाराज गौड, प. पू. किशोर महाराज तिवारी, नागेश महाराज पाथरूडकर यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्नेहा बांगड व सौ. अलका सारडा यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार निलेश मालानी यांनी मानले. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी कल्पना लाहोटी, सुनील लाहोटी, विना साबू, महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ आणि कर्मचारीवृंदांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विविध मान्यवर, समाजसेवक आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती.

## जनावरांची वाहतूक करणारे पिकअप वाहन जामवाडी शिवारात पकडला

### तालुका जालना पोलीसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** मिळालेल्या माहितीनुसार जालना तालुक्यातील जामवाडी देऊळगाव राजा रोडवर काल दिनांक सात शनिवार रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास महिको कंपनी जवळ एका पिकअप वाहनांमध्ये अवैधरित्या पाच बैल डांबून वाहतूक करत असताना संशयित आरोपी इमतियास खालील अहमद वय ४५ वर्ष राहणार शिषटेकडी जूना जालना याला त्याची पिकअप गाडी क्रं. MH. 46. BU 1698 सह पोलिसांनी ताब्यात घेत त्याच्यात गाडीत असलेले बैलांची सुटका करून गौशाळेत पाठवण्यात आले असून संशयीत आरोपी विरोधात तालूका पोलीस ठाण्यात रविवार दिनांक आठ रोजी १:३० वाजेच्या सुमारास उत्तम भिकाजी मतकर वय ५६ वर्ष यांच्या फिर्यादीवरून कलम ११ (१) (घ), ११ (१) (ड) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## परतूर येथे बांगलादेशातील हिंदूंच्या मानवाधिकार समर्थनार्थ विराट मोर्चा

# बांगलादेशातील कट्टरवाद्यांना धडा शिकवणे गरजेचे - आ. लोणीकर

### मानवाधिकारांचे हनन करणाऱ्या वृत्तींना सरकारने रोखावे - सुभाष अंभुरे

**परतूर । प्रतिनिधी -** बांगलादेशात गेल्या काही महिन्यांमध्ये हिंदू मंदिरांवर झालेले हल्ले, तोडफोड त्याचबरोबर हिंदू आबालवृद्ध आणि महिलांवर झालेले अमानवीय अत्याचार आणि त्यात सातत्याने होत असलेली वाढ ही गंभीर बाब असून अशाप्रकारच्या सर्व मानवाधिकारांचे हनन करणाऱ्या वृत्तींना रोखण्यासाठी कार्यवाही व्हावी व अशा कार्यवाहीस आम्ही भारताचे हिंदु सरकारसोबत ठामपणाने उभे असल्याचे प्रतिपादन रा. स्व.संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सुभाष अण्णा अंभुरे यांनी विराट मोर्चाप्रसंगी केले. प्रास्ताविक करताना सावता काळे यांनी मानवअधिकार हिंदूंच्या प्रश्नावर शंड पणाची भूमिका घेत आहे त्या ठिकाणी हिंदूंची मंदिरे आमच्या माताभगिनी यांच्यावर हिंदू थंड बसता कामा नये असे प्रतिपादन केले. बांगलादेशात १ कोटी ३१ लाख हिंदूंच्या जीवाला आज धोका आहे. त्या ठिकाणी कधी मंदिरे पाडली जात आहेत, तर कधी पुतळे तोडले जातात, हिंदू प्रतीकांची विटंबना केली जात आहे, या सर्व अन्यायाविरोधात आवाज उठवणारा किंवा निषेध करणाऱ्या हिंदूंच्या हत्या केल्या जातात. अनेक व्हिडिओ असे आहेत जे आपल्यासारख्या सहिष्णू हिंदू बांधवांना बघता येणे अशक्य आहे. आपण बघितलेल्या प्रत्येक व्हिडिओमध्ये हिंदूवर अत्यंत क्रूरपणे त्रास दिलेला दिसून येत आहे. या ठिकाणी हिंदूवर होणारे हल्ले आणि धमक्यांची तीव्रता वाढत आहे. याची दखल घेत बांगलादेशातील कट्टरवाद्यांना धडा शिकवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

हिंदू धर्मातील प्रत्येक व्यक्ती सहिष्णुवृत्तीचा असून त्यासहिष्णुवृत्तीचा गैरफायदा घेत बांगलादेशात हिंदूवर अनन्वित अत्याचार केले जात आहेत ही बाब बांगलादेशापूर्ती मर्यादित न राहता संपूर्ण जगासाठी एक उदाहरण आहे की आपण आपल्या धर्माची रक्षा स्वतः करायची आहे. आता तरी जागा व्हा नाही तर आपले पण असेच हाल होतील, आपला धर्म टिकला तर आपली संस्कृती टिकेल आपली संस्कृती टिकली तर आपण टिकू त्यासाठी प्रत्येकाने जागृत राहण्याची गरज असून कट्टर वाद्यांचा आपली धर्म आणि संस्कृती संपविण्याचा डाव आपण ओळखला पाहिजे असेही यावेळी लोणीकरांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, विश्व हिंदू परिषदेचे सावता काळे, अर्जुन जगताप, सचिन काटे, कैलास चव्हाण यांच्यासह असंख्य कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले होते. परतूर मध्ये सकाळी ११ वाजता सुरु झालेला मोर्चा महादेव मंदिर पासून तहसील कार्यालय समोर समारोप करण्यात आला. सदरील मोर्चात मोठ्या प्रमाणावर तालुक्यातील हिंदू बांधव सहभागी झाले होते.मोर्चा समारोप नंतर तहसीलदार प्रतिभा गोरे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात हिंदूंच्या धार्मिक स्थळ आणि मंदिरांचे संरक्षण बांगलादेशात स्थित हिंदू समाजाच्या सर्व धार्मिक स्थळांचे आणि मंदिरांचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने कठोर शब्दांमध्ये बांगलादेश सरकारला आपल्या भावना कळवून तात्काळ योग्य ती पावले उचलण्यास आग्रह करावा. हिंदू धर्माचार्यांची सूटका इस्कॉनचे चिन्मय कृष्ण महाराज आणि त्यांचे सहकारी तसेच, इतर हिंदू धर्माचार्यांची केलेल्या बेकायदेशीर अटकेतून तात्काळ सूटका व्हावी अशाप्रकारच्या सूचना भारत सरकारने बांगलादेशातील अंतरिम शासनास कराव्या. हिंदू महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध बांगलादेशात झालेल्या सत्तांतरावेळी आणि त्यानंतर गेल्या कित्येक महिन्यांमध्ये विविध समाजमाध्यमांमधून बांगलादेशातील हिंदू मुली व महिलांवर झालेले अमानवीय अत्याचार आणि त्यांच्या मानवाधिकारांचे हनन समोर आलेले आहे. सदरील अमानवीय अत्याचार आणि मानवाधिकारांचे उल्लंघन तात्काळ थांबवण्यासाठी भारत सरकारने जागतिक स्तरावर ह्यासंबंधी आपले मत जाहीरपणाने प्रदर्शित करावे व अंतरराष्ट्रीय समुदायास याबाबत अवगत करावे. समाज माध्यमे आणि समाजात होत असलेले हिंदूंचे धार्मिक उत्पीडन बांगलादेशात उपरोक्त नमूद अत्याचार




आणि मानवाधिकार उल्लंघनाच्या घटनांसोबतच तेथील सामाजिक स्तरावर होत असलेले अल्पसंख्यांक हिंदू समाजाचे धार्मिक उत्पीडन थांबवण्यासाठी योग्य ती पावले उचलणे अत्यावश्यक आहे. याचबरोबर विविध समाज माध्यमांमध्ये (Social Media) हिंदू धर्म, हिंदू समाज आणि हिंदू संत यांचे होणारे धार्मिक उत्पीडन तात्काळ थांबवण्यात यावे आणि अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्या कट्टरता वाद्यांविरोधात योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यासंबंधी भारत सरकारने जागतिक स्तरावर हयासंबंधी आपले मत जाहीरपणाने प्रदर्शित करावे व अंतरराष्ट्रीय समुदायास याबाबत अवगत करावे. असे सांगण्यात आले. सदरील निवेदनावर सावता काळे, अर्जुन जगताप,कैलास चव्हाण, सचिन काटे, अशोकराव मसलकर, किशन अग्रवाल, शिवकुमार सोळंके, अर्जुन टेकूळे, शुभम सातोनकर, आनंद बगडिया, महेंद्र कोटेचा, राम दरगड,कुणाल बंसिले,सौरभ नरवैये,विकास मोरे,योगेश खंडेलवाल,जयवंत हातवनकर,नारायण गायकवाड,अजित पोरवाल,अविनाश खरात,आनंद कोटेचा,रोहीत ठाकूर,शरद चव्हाण, विजय राऊत, बालाप्रसाद जेथलिया, मनिष अग्रवाल, शुभम ठाकूर, रमेश भापकर, संपत टकले, शत्रूघ्न कणसे, ओम मोर, प्रवीण सातोनकर, राजेंद्र मुंदडा, संभाजी घणवट, योगेश गायकवाड, रोहीत कपाळे, गणेश ठाकूर, कैलास मुजमुळे, ज्ञानेश्वर माने, संस्कार भालेराव, आकाश राजपूत, सुरेश माने, अजय मसलेकर यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

### मानवी अधिकार दिन उत्साहात संपन्न

# भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी - सरकारी अभियोक्ता वर्षा मुकीम



**जालना । प्रतिनिधी -** मानवी हक्क दिन म्हणून १० डिसेंबर हा दिवस सर्वत्र साजरा करण्यात येत असतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हे तत्व नमुद केले आहेत. या चार तत्वांचे पालन म्हणजेच मानवी अधिकार होय. नागरिकांनी आपल्यासह दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा प्रथमतः विचार करणे गरजेचे असून सर्व भारतीयांनी बंधुता संकल्पना मनात रुजवावी, असे प्रतिपादन सरकारी अभियोक्ता वर्षा मुकीम यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात मंगळवार दि.१० डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता मानवी हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ड. महेश धन्नावत, तहसीलदार प्रणाली तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सरकारी अभियोक्ता श्रीमती मुकीम म्हणाल्या की, १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने ३० मानव अधिकाराचे घोषणापत्र स्विकारले. तर १९९३ पासून भारतात मानव अधिकार कायदा लागू करण्यात आला. आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापन झाला. भारतीय संविधानाने दिलेले हक्क हिरावल्यास ते मिळवून देण्याचे काम मानवाधिकार आयोग करतो. जीवनात मानवाला उत्कर्ष साधायचा असेल तर सर्वांना माणसाप्रमाणे जगू देणे महत्वाचे आहे. प्रत्येक मानवाला नेहमी आपल्या कर्तव्याची जाण हवी. मानवाची उत्क्रांती सांगुन समाजात जीवन जगत असतांना झालेल्या स्थितीबदलाचा आलेखही त्यांनी यावेळी मांडला.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री.महाडिक म्हणाले की, भारतामध्ये जन्मताच जे हक्क प्राप्त होतात ते मुलभूत हक्क भारतीय संविधानात सर्वांना समान देण्यात आले आहेत. भारतीय संविधानाने बहाल केलेले अधिकार हे जबाबदारीशिवाय पुर्ण होत नाहीत याची जाणीव ठेवणे महत्वाचे आहे. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना सुखी व आनंदाने जीवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे. आपले कर्तव्य सचोटीने पार पाडले तर मानवी हक्क अबाधित राहतील. भारतातील सर्व नागरिकांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समान हक्क दिलेले आहेत. समाजातील गरीब व्यक्तीला न्यायालयात जाण्यासाठी विनामुल्य वकीलांची सहाय्यता मिळण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ड. धन्नावत यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार प्रणाली तायडे यांनी केले. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीमधील विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

---

# याजसाठी केला अट्टाहास

चला एकदाचे महायुतीचे ईव्हीएमच्या सहाय्याने अगदी लोकशाही मार्गाने महमहायुतीचे सरकार सत्तेवर आले. मी पुन्हा येईन असं वचन देवेन्द्रजींनी पुर्ण केले. त्याच बरोबर एकनाथ शिंदे आणि ज्यांच्या नावावर पहाटे तीनच्या सुमारास शपथविधीचा विक्रम आहे त्यांनाही उपमुख्यमंत्रिपदी बसवले आणि अनेक त्रस्त समंध शांत केले आणि हो कर्तव्यदक्ष न्यायालयाने सुद्धा अजिदादांना अगदी क्लीन चीट देवून दोषमुक्त केले आणि हजार कोटीची मालमत्ता पुन्हा बहाल केली. आणि महाराष्ट्र व्यभिचार मुक्त केला. आता खऱ्या अर्थाने महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होणार याची नांदी आहे. आता यापुढे पाच पन्नास कोटी रुपयांचा भ्रष्टाचार मान्य नाही. कमीत कमी हजार कोटीचं मायाजाल हवे तरच भाजप मध्ये प्रवेश असा संदेश महाराष्ट्रात पसरवला गेला आहे. आता लाडक्या बहिणींना आणखी सुगीचे दिवस येणार आहेत त्यामुळे अगदी काही दिवस महिन्यापूर्वी अल्पवयीन मुलींवर झालेले बलात्कार,शेतकऱ्यांच्या आत्महत्या, आपल्या राजाचा कोसळलेला पुतळा यांसारखे छोटे मोठे अपराध पोटात घालायचे आणि नवीन सरकार काय फुकट वाटणार या घोषणेकडेच लक्ष केंद्रित करायचे. बाकी भ्रष्टाचार, बलात्कार बेरोजगारी याकडे दुर्लक्ष करायचे आणि उठ मराठ्या उठ पाय लावून पळत सूट. आपल्या लाडक्या बहिणीसाठी नवीन फॉर्म घेऊन ये आणि लाचार होऊन स्वाभिमान गिळून पारा खाली बसून गजाली मारत गप्प बस. बाकी देवाक काळजी.

**- राजन वसंत देसाई**

---

पान १ वरुन

## जिल्ह्यात मोर्चा, बंद....

त्यानंतर गेल्या कित्येक महिन्यांमध्ये विविध समाजमाध्यमांमधून बांगलादेशातील हिंदू मुलीव महिलावर झालेले अमानवीय अत्याचार आणि त्याच्या मानवाधिकारांचे हनन समोर आलेले आहे. सदरील अमानवीय अत्याचार आणि मानवाधिकारांचे उत्तनात्काळ गांवण्यासाठी भारत सरकारने जागतिक स्तरावर यासंबंधी आपले मत जाहीरपणाने प्रदर्शित करावे व अंतरराष्ट्रीय समुदायास याबाबत अवगत करावे

समाज माध्यमे आणि समाजात होत असलेले हिंदूंगे धार्मिक उत्पीडन बांगलादेशात उपरोक्त नमूद अत्याचार आणि मानवाधिकार उल्लंघनाच्या घटनांसीबतच तेथील सामाजिक स्तरावर होत असलेले अल्पसंख्यांक हिंदू समाजाने चार्मिक उत्पीडन विकण्यासाठी योग्य ती पावले उथलपो अत्यावश्यक आहे. याचबरोबर विविध समाज माध्यमांमध्ये हिंदू धर्म, हिंदू समाज आणि हिंदू संत यांचे होणारे धार्मिका उत्पीडन तात्काळ गांववश्यात यावे आणि अशा प्रकारचे एत्य करणा-या कट्टरता वाद्याविरोधात योग्य तो कायदेशीर कार्यवाही करण्यासंबंधी भारत सरकारने जागतिक स्तरावर ड्यारायची आपले मत जाहीरपणाने प्रदर्शित करावे व अंतराष्ट्रीय समुदायास माथावत अवगत कराये

अशाप्रकारे, आम्ही भारतीय हिंदू समाज बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या आयायारा बददल सजग आहोत आणि प्रस्तुत निवेदनाद्वारे आम्ही केलेल्या मागण्या हया जागतिक स्तरावर मान्य असलेल्या मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी केलेल्या आहेत. आम्ही भारताच्या नागरीकांनी जागतिका मानवाधिकारांना भारताच्या राज्यघटनेत मुलभूत अधिकार म्हणून मान्यता दिलेली आहे आणि भारतातराहणा-या आणि येणा-या प्रत्येक व्यक्तीच्या मानवाधिकारांचे जतन व्हावे याबद्दल आम्ही जागरूक असतो. यास्तव आम्ही भारताचे हिंदू जागतिक स्तरावर होणा-या हिंदूंच्या मानवाधिकारांचे उल्लंघन गांभीर्याने घेत आहोत आणि बांगलादेशात होत असलेले हिंदूंचे धार्मिक उत्पीडन आणि मानवाधिकारांचे हनन तात्काळ स्वरूपात बंद होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि भारताचे पंतप्रधान म्हणून आपल्या स्तरावरून होणा-या बांगलादेशीय हिंदू समाजाच्या संरक्षणासाठी उचलण्यात येणा-या प्रत्येक निर्णयात आम्ही ठामपणे आपल्या सोबत आहोत. आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

## कुर्ला बस अपघात प्रकरण ; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांचे घटनास्थळी जाऊन मदत कार्य

**मुंबई । प्रतिनिधी -** मुंबई उपनगरातील कुर्ला परिसरात सोमवारी रात्री एका बेस्ट बसने नागरिकांना चिरडल्याची दुर्देवी घटना घडली.या भीषण अपघातात आतापर्यंत ७ जणांचा मृत्यू झाला असून ४८ जण जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे.अपघातानंतर तात्काळ तिघांचा मृत्यू झाला होता,तर उर्वरित जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.यावेळी या घटनेची मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन जखमी नागरिकांसाठी मदत कार्य सुरू केले, जखमींवर भाभा रुग्णालय,कुर्ला (प),हबीब रुग्णालय,कुर्ला (प),कोहिनूर रुग्णालय, कुर्ला (प)आणि सायन हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.यावेळी रुग्णसेवक मंगेश चिवटे यांनी भाभा हॉस्पिटलमध्ये या ठिकाणी जाऊन जखमी रुग्णांची भेट घेतली व त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली आणि दिलासा दिला.यावेळी स्थानिक आमदार मंगेश कुडाळकर उपस्थित होते.सदर दुर्घटनेनंतर प्रसंगावधान दाखवून आमदार कुडाळकर आणि समस्त शिवसैनिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी नागरिकांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यासाठी सर्वतोपरी मदत केली.तसेच या घटनेमध्ये जे कोणीही व्यक्ती जखमी झाले आहेत त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांच्या सर्व उपचाराची जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष घेणार असल्याची माहिती रुग्णसेवक मंगेश चिवटे यांनी दिली.सदर घटनेची राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गांभीर्याने दखल घेतली आहे.मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून पाच लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

## ऋतुजा जोशी एम. ए. संगीत विषयात विद्यापीठात सर्वप्रथम



**परभणी । प्रतिनिधी -** कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथील एम. ए. संगीत विषय अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कु. ऋतुजा राजेश जोशी हिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड उन्हाळी परीक्षा २०२४ या परीक्षेत एम.ए.संगीत विषयात विद्यापीठातून प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला.

तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. हेमंतराव जामकर, उपाध्यक्ष मा.ड. किरणराव सुभेदार, कोषाध्यक्ष डॉ. अभयराव सुभेदार, सचिव मा. विजयराव जामकर, सहसचिव डॉ. संजयराव टाकळकर, संस्थेचे सर्व संचालक, प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले आणि सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी ऋतुजा जोशी यांना शुभेच्छा दिल्या.

ऋतुजा जोशी यांच्या या यशा साठी संगीत विभाग प्रमुख डॉ. रवींद्र इंगळे, डॉ.पल्लवी कुलकर्णी यांचे मार्गदशन लाभले.

## अरविंद चव्हाण यांना विधान परिषदेवर घ्या; आण्णासाहेब चित्तेकर यांचे रक्ताने पत्र

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काग्रेस पार्टी चे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण यांना विधानपरिषदेवर घेण्यासाठी जिल्हाउपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन व विकास समिती सदस्य आण्णासाहेब चित्तेकर यांनी उमुख्यमंत्री अजित पवार यांना स्वतःच्या रक्तांने पत्र लिहीले आहे. आमदार राजेशजी विटेकर हे आमदार विधानसभेवर निवडुन गेल्याने त्यांची विधानपरीषदेची जागा खाली होणार असल्याने जालना जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना बळ मिळण्यासाठी माजी आ अरविंदराव चव्हाण यांना विधानपरीषदेवर घेण्यासाठी रक्ताने पत्र लिहून अजित पवार यांना साकडे घातले आहे. गेल्या अनेक वर्षापासून अरविंदराव चव्हाण अजित पवार यांचे समर्थक म्हणुन काम करत आहे. चव्हाण हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष झाल्यापासुन पक्षाची मोठ्या प्रमाणात बांधणी केली असुन प्रत्येक जातीधर्माच्या लोकांना सोबत घेऊन त्यांना न्याय देण्याचे काम जालना जिल्ह्यात श्री चव्हाण यांनी केले आहे. अनेक महत्वाच्या कमिट्यावर सर्वसामान्य कार्यकर्त्यांची शिफारस करुन त्यांना कमिट्या दिल्या आहे. जालना जिल्ह्याचा इतिहास बघता सर्वच राजकिय पक्षाच्या प्रमुखानी महत्त्वाच्या कमिट्या एकतर स्वतः किंवा आपल्याच नातेवाईकांना दिलेल्या आहेत परंतु चव्हाण साहेबांनी स्वतः किंवा नातेवाईकांना महत्त्वाच्या कमिट्यावर न जाता सर्वसामान्य कार्यकर्त्यांना न्याय दिला आहे. म्हणुन जालना जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची अरविंद चव्हाण यांना विधानपरिषदेवर घेण्याची मागणी असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

